झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/२४५/२०२०
दिनांक : २४/०२/२०२०

**झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पुर्वसूचना)**

**महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१ कलम ३ ड अन्वये**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. १९/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद सि.स.नं.१००७ व १००८, स.नं.८९ व ९०, लोकमान्य कॉलनी, कोथरुड, पुणे येथील लोकमान्य कॉलनी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर (पूर्णत:) अंदाजे क्षेत्रफळ १०८६५.७३ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी . आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२६/११/२०१८ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदरच्या प्रस्तावास झो.पु.प्रा. नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि.०९/०१/२०२० रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-२ नुसार सदर मिळकतीवर एकुण ८०७ झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी ५३३, पात्र बिगर निवासी २६ व संयुक्त ६ या प्रमाणे एकुण ५६५ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र टरले आहेत; आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्र दि.२१/०१/२०१९ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये **झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०१९ पृष्ठ क्र.५१ येथे आणि दैनिक सांज महानगरी वृत्तपत्रात दि.२५/०१/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२८/०१/२०१९ रोजी डकविण्यात आला आहे; आणि

ज्याअर्थी, उक्त क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही. सबब, 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, विकसक मे.प्रथमेश कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते स्थलांतरण करणेबाबतची जबाबदारी आम्ही विकसक या नात्याने घेत आहोत याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडे झोपडपट्टीधारकांची कोणतीही तक्रार येवू देणार नाही, तक्रार आल्यास त्याचे निवारण करु, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कोणतीही तोषीस लागू देणार नाही, असे हमी घेत आहोत, असे हमीपत्र दि.२७/०१/२०२० रोजी या कार्यालयाकडे सादर केले आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र (पुर्वसूचना)'** म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

उक्त क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळविण्यात येत आहे की,-

Scanned with CamScanner

i) उक्त क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

ii) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन खुली करावी.

iii) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

iv) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

v) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं.१००७ व १००८, स.नं.८९ व ९०, लोकमान्य कॉलनी, कोथरुड, पुणे | १०८६५.७३ चौ.मी. | **पुर्वेस -** रस्ता<br>**पश्चिमेस -** स.नं.९२ व ९३<br>**दक्षिणेस -** रस्ता<br>**उत्तरेस -** रस्ता | मे. प्रथमेश कन्स्ट्रक्शन्स् ए-१०१ निलायन फायनल प्लॅट नं.७०/६/१, सि.टी.एस. नं.४७/६/१ कै.वी.आ.मोडक पथ अभिनव शैक्षणिक संकुल जवळ,एरंडवणे, पुणे-४११ ००४ |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

20.2.2020

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** २८/०२/२०२०

Scanned with CamScanner